दै. विदर्भ मतदार दि. 23 जून 2022

# भारती महाविद्यालय आर्णी येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

**आर्णी(प्रतिनिधी) :** राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व सुशिला रा.भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी व मंगलम योग फाऊंडेशन आर्णी यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिवस - २१ जुन २०२२ ला सकाळी ७.०० वाजता साजरा करण्यात आला. यामध्ये प्रा. एस. बी. चोरडीया यांनी महाविद्यालयाच्या पटांगणात योगासने, प्राणायम प्रात्यक्षिके करून घेतले. त्यांनी योग करा, निरोगी,सुदृढ शरीर आणि शांत मन याची एकच गुरूकिल्ली आहे ती म्हणजे योग. निर्धार करा की मी रोज योगा करेल निरोगी आयुष्य ठेवण्याचा हा मंत्र नेहमी जपा. संपूर्ण जगाला आनंदित करू चला योगाकडे वळू. योगा करण्याचा नियमित सराव करूया आपले जीवन आनंदी आणि निरोगी करूया. तसेच त्यांनी प्रत्येक योगासने कशी करायची व त्यांचे फायदे काय काय आहेत हे सांगितले. याप्रसंगी विद्यार्थांनी प्रा. चोरडिया यांना योगासनाबद्दल प्रश्न विचारले. विचारलेल्या प्रश्नाचे प्रा. चोरडिया सरांनी उत्तरे देवुन समाधान केलेया कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य एन.ए.पिस्तुलकर व इतर प्रध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



पुण्य नगरी

# आर्णी येथील भारती महाविद्यालयात लसीकरण शिबिर



**आर्णी** : स्व. राजकमल भारती कला, वाणिज्य व सुशीलाताई भारती विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामीण आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड-१९ लसीकरण शिबिर महाविद्यालयात घेण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. एस. व्ही. वानखडे, प्रा. मिलिंद पांडे, प्रा. प्रतिक सोनोने, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संकेत हरसुलकर, लसीकरण विभागाचे शंकर टोपे, सुरेश चौधरी, अनिता ढोले, स्मिता कांबळे यांची उपस्थिती होती. या लसीकरण शिबिरात महाविद्यालयातील ७५ विद्यार्थ्यांना को-व्हॅक्सिन व कोविशिल्डचा पहिला व दुसरा व बूस्टरडोज देण्यात आला. या शिबिरासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

sya

Page No.3 August 04, 2022

# भारती महाविद्यालय आर्णी येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा

**आर्णी / जनमाध्यम प्रतिनिधी** - येथील स्व. राजकमलजी भारती कला. वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दि. २४ सप्टेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी रा.स.यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरात साफसफाई करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. पीस्तुलकर, प्रमुख अतिथि म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख, डॉ. एस. व्ही. वानखडे व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धनंजय देशमुख हे होते. या सभेला मोठ्या संख्येने प्राध्यापक वृंद व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते. डॉ. धनंजय देशमुख सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा जडणघडणीचा प्रवास तसेच उद्दिष्टे व जबाबदारी या बद्दल बहुमूल्य मार्गदर्शन केले. समाजोपयोगी कार्य करा व स्वताचा विकास करून घ्या याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रज्वल ढाकुलकर यांनी केले व आभार प्रदर्शन कु. तन्वी चोपडे या विद्यार्थ्यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने व सहाय्यक कार्यक्रम महिला अधिकारी प्रा. डॉ.रुपाली टेकाडे यांनी परिश्रम घेतले.



दैनिक पब्लिक पोस्ट

# भारती महाविद्यालयात संविधान दिन

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**आर्णी** : येथील स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दि. २६ नोव्हेंबर २०२२ ला संविधान दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. पीस्तुलकर हे अध्यक्ष, प्रमुख अतिथि म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख, डॉ. एस. व्ही. वानखडे व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धनंजय देशमुख तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम. एम. पांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मागदर्शन करताना प्रा. डॉ. धनंजय देशमुख यांनी संविधान दिनाचा इतिहास आणि संविधान तयार करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुमूल्य योगदान तसेच संविधानाबद्दल संपुर्ण रचना याबद्दल माहिती दिली. या प्रसंगी डॉ. एन. ए. पिस्तूलकर सर यांनी संविधानाने दिलेले कर्तव्य आणि अधिकार या बद्दल बहुमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमात संविधानाची उद्धेशिकाचे वाचन करून शपथ घेण्यात आली.या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी संकेत हर्सुलकर व कु. नुजबा खान यांनी संविधान दिनाबद्दल भाषण करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन कु. महीन खान या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक वृंद व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थीत होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे , सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.रुपाली टेकाडे यांनी परिश्रम घेतले.

लोकमत

# भारती महाविद्यालयात एचआयव्हीवर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**आर्णी** : आर्णी येथील राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालयात 'एचआयव्ही, एड्स आणि आजचा युवक' यावर मार्गदर्शन घेण्यात आले.

भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. जितेंद्र कौसल्ये अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तम गुडे, प्रमुख वक्ते म्हणून विशाल शेजव उपस्थित होते. विशाल शेजव यांनी एचआयव्ही, एड्स आणि आजचा युवक यावर विद्यार्थ्यांना विषयावर मार्गदर्शन केले. एचआयव्ही, एड्स या रोगाचे कारण व त्याचे दुष्परिणाम सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूक राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी



विचारलेल्या शंकांचे निरसन केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतीककुमार सोनोने यांनी केले.

कार्यक्रमाला प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. रूपाली टेकाडे यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Dec 19, 2022
Powered by: erelego.com